जिल्हाधिकारी लातूर यांचे कार्यालय,
(पुरवठा विभाग)

---

संदर्भः-
1. महाराष्ट्र शासन, अ.ना.पु.व ग्रा.सं.विभाग, मुंबई पत्र क्र. रॉकेल-1000/प्र.क्र.797/नापु-27 दि. 26.12.2003
2. महाराष्ट्र शासन, अ.ना.पु.व ग्रा.सं.विभाग, मुंबई पत्र क्र. रॉकेल-1005/प्र.क्र.4782/नापु-27 दि. 05.08.2005
3. मा.उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद यांचे आदेश याचिका क्र.9018/2011(सह इतर 17 यांचिका) दि. 01.02.12
4. महाराष्ट्र शासन, अ.ना.पु.व ग्रा.सं.विभाग, मुंबई पत्र क्र. रॉकेल-केईआर1011/सीआर-423/नापु-27 दि. 30.12.11
5. महाराष्ट्र शासन, अ.ना.पु.व ग्रा.सं.विभाग, मुंबई पत्र क्र. रॉकेल-1512/प्र.क्र.290/नापु-27 दि.04.01.13
6. महाराष्ट्र शासन, अ.ना.पु.व ग्रा.सं.विभाग, मुंबई यांचे शासन निर्णय क्रं.रॉकेल-2014/प्र.क्रं.172/नापू-27 दि.20/08/2015
7. महाराष्ट्र शासन, अ.ना.पु.व ग्रा.सं.विभाग, मुंबई यांचे पत्र क्रं.रॉकेल-1015/प्र.क्रं.272/नापू-27 दिनांक 24/08/2015
8. महाराष्ट्र शासन, अ.ना.पु.व ग्रा.सं.विभाग, मुंबई यांचे पत्र क्र.केईआर/2015/386/सीआर-238/नापु-27 दि.08.09.2015
9. महाराष्ट्र शासन, अ.ना.पु.व ग्रा.सं.विभाग, मुंबई यांचे पत्र क्रंरॉकेल-1015/प्र.क्रं.272/नापू-27 दि.28/09/2015
10. या कार्यालयाचे पत्र क्रं.2015/पूरवठा/पू-3/कावि-239 दिनांक 05/10/2015
11. या कार्यालयाचे समक्रमांक आदेश दिनांक 04/04/2016
12. महाराष्ट्र शासन, अ.ना.पु.व ग्रा.सं.विभाग, मुंबई यांचे पत्र क्र.केईआर-2016/सीआर-87/नापु-27 दि.13.04.2016

---

क्र.2016/पुवि/पुरवठा-3/केरोनियतन-4/सीआर-97
जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर
दिनांकः- 16/04/2016
25

**//आदेश//**

शासनाकडून **माहे एप्रिल-2016** करिता केरोसीन कोटा आदेश प्राप्त झालेले नाहीत तथापि माहे **मार्च** -2016 या महिन्याचे केरोसीन केरोसीन नियतन 1416 के.एल. गृहीत धरुन कोटयाच्या 60 % केरोसीन नियतन उचल व वाटप करण्याचे आदेश संदर्भ क्रं.11 अन्वये तालुका निहाय निर्गमित करण्यात आले होते. **शासनाने संदर्भ क्रं.12 अन्वये माहे एप्रिल 2016 करिता लातूर जिल्हयासाठी केरोसीन कोटा 1044 के.एल. मंजूर करण्यात आला आहे.** त्यामुळे संदर्भ क्रं.11 चे आदेश अधिक्रमीत करुन माहे **एप्रिल 2016 साठी 1044 के.एल. प्रमाणे सुधारीत केरोसीन नियतन उचल व वाटप करण्याचे आदेश निर्गमित करण्यात येत आहे.** त्यानूसार सर्व संबधित परवानाधारकाने मुदतीत केरोसीन उचल व वाटप करण्यात यावे.

कंपनी एजंटाना आदेशित करण्यांत येते की, **एजंटाकडे सदर आदेश प्राप्त होताच तीन दिवसाचे आत रक्कम अर्धघाऊक परवानाधारक यांचेकडून जमा करुन घेवून अर्धघाऊक केरोसीन विक्रेत्यांना केरोसीन वितरण करावे अर्धघाऊक परवानाधारक यांनी सदरची रक्कम कंपनी एजंटाकडे आदेश निघाल्यापासून तीन दिवसांचे आत डीडी/रोख जमा करून केरोसीनची मागणी करावी.** अर्धघाऊक विक्रेत्यांना केरोसिन वितरण करताना प्रथम टँकर तहसील कार्यालय नेवून तहसीलदार यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी/कर्मचारी यांचे समक्ष केरोसिन उतरून घेतले बाबत तहसीलदार यांचे प्रमाणपत्र घेऊन वितरणाच्या अहवाल सोबत प्रमाणपत्र या कार्यालयास सदर करावा. सर्व एजंटाना सूचित करण्यात येते कि, अर्धघाऊक विक्रेत्यांना **केरोसिनचे डिलेव्हरी सकाळी 8:00 ते सायंकाळी 6:00 वाजेपर्यंत देण्यात यावी तहसीलदार यांनी 6:00 वाजल्यानंतर केरोसिन टँकरची नोंद करून घेऊ नये.** तसेच दिलेले केरोसिन नियतन वेळेवर उचलण्याची व्यवस्था करावी. किरकोळ विक्रेत्यांना कार्ड संख्येनुसार तसेच परिमाणानुसार वाटप करावे. वाटपाचा अहवाल तहसील कार्यालय व कार्यालयास सदर करावा. महिन्याच्या 10 तारखेपर्यंत 60 टक्के 17 तारखेपर्यंत 85 टक्के व 25 तारखेपर्यत 100 टक्के केरोसिन उचल करावी. अर्धघाऊक केरोसिन विक्रेत्यांनी 25 तारखेपर्यंत 100 टक्के केरोसिन वाटप करावे. केरोसिन नियतनाची उचल वेळेवर न केल्यास रीतसर कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी. महिन्याच्या 25 तारखेपर्यंत उचल पूर्ण न होण्याची शक्यता असल्यास त्या महिन्याच्या 20 तारखेस उचल होणे शिल्लक नियतनाची माहिती कारणासह लेखी स्वरुपात सबळ पुराव्यासह या कार्यालयास देण्यात यावी. 20 तारखेस सुट्टी असल्यास त्या अगोदरच्या दिवशी माहिती घ्यावी. माहिती न दिल्यामुळे नियतन व्यपगत झाल्यास त्यास आपणास वैयातिक जबाबदार धरून नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**द्वारपोच केरोसीन वितरणाबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करावी**

अ) न्याय निर्णयाच्या परिच्छेद 6 मध्ये दिलेल्या आदेशानुसार व्दारपोच केरोसीन वितरणासाठी जिल्हयातील 50 टक्के गावाची निवड करण्यात यावी.सदर गावाचा व त्या केरोसीन पुरवठा करण्याच्या रस्त्याच्या नकाशा तयार करुन त्या गावातील किरकोळ विक्रेत्यांना व्दारपोच केरोसीन पुरवठा करावा.

ब) न्याय निर्णयाच्या परिच्छेद 7 मध्ये दिलेल्या आदेशानुसार अर्धघाऊक व घाऊक विक्रेत्यांना दरमहा केरोसीन वितरणासंबंधी विशेष समोपदेशाने मा. उच्च न्यायालयास दिलेल्या आश्वासनाचे पालन होईल असे पहावे.

ब) न्याय निर्णयाच्या परिच्छेद 8 मध्ये दिलेल्या आदेशानुसार अर्धघाऊक विक्रेते असलेल्या ठिकाणी केरोसीन एजंटाना केरोसीन डेपो ते तालुका मुख्यालयापर्यंत प्रत्यक्ष अंतरएवढा वाहतुक खर्च ज्या 50 टक्के गावातील किरकोळ विक्रेत्यांना व्दारपोच केरोसीन पुरवतील त्या अर्धघाऊक/घाऊक विक्रेत्यांना देय राहील. उर्वरित ज्या 50 टक्के गावातील किरकोळ विक्रेते स्वत: केरोसीन उचल करतील त्या किरकोळ विक्रेत्यांना 67 कि.मी. अंतराच्या प्रचलित दराने वाहतुक खर्च देय राहील. तहसीलदार यांचेकडुन प्राप्त झालेले व्दार वितरणाचे प्रस्ताव मान्य करण्यात येत आहेत. त्यानुसार तहसीलदार यांनी व्दारवितरणाव्दारे केरोसीन वितरण करावे. व नियमित पुरवठा होण्यासाठी उपाययोजना करावी. सदर योजनेनुसार व्दारपोच केरोसीन पुरवठा करण्यांस काही अडचणी निदर्शनास आल्यास त्या सविस्तरपणे शासनास कळविण्यात याव्यात.

ड) प्राप्त केरोसीनचे नियतन उचलतांना ग्रामदक्षता समिती समक्ष पंचनामा करणे आवश्यक आहे. त्याशिवाय पुढील महिण्यांचे केरोसीन नियतन देण्यांत येणार नाही याबाबत तहसिलदार यांनी सर्व संबंधीतांना अवगत करावे.

पान दोन पहा. . . .